# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दीक्षांत समारंभ

## विद्यार्थ्यासाठी व सर्व संलग्नित महाविद्यालयासाठी अधिसूचना

- विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या प्रांगणामध्ये शुक्रवार, दि. २२ फेब्रुवारी, २०१९ रोजी दुपारी १:३० वाजता संपन्न होत आहे. या समारंभासाठी महामहिम कुलपती मा. श्रीचेन्नमनेनी विद्यासागर राव, राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री भीमराया मेत्री संचालक, भारतीय प्रबंध संस्थान, तिरूचिरापल्ली हे उपस्थित राहणार आहेत.
- ५५ व्या दीक्षांत समारंभामध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्राप्त करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या नूतन परिनियमानुसार पदवी वितरण प्रक्रियेमध्ये बदल केलेला असून प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी स्विकारण्याचा विकल्प ज्या विद्यार्थ्यांनी दिला आहे त्यांना संबंधित महाविद्यालयामधून सन्मानपूर्वक पदवी वितरण समारंभामध्ये (Graduation Day Ceremony) देण्यात येतील. याकरिता विद्यापीठामध्ये स्वतंत्र वितरण व्यवस्था नसेल यांची कृपया नोंद घ्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांनी टपालाद्वारे पदवी स्विकारण्याचा विकल्प (In Absentia) विद्यापीठाच्या संकेत स्थळावर दिलेला आहे, आणि ज्या विद्यार्थ्यांनी पदवी स्विकारण्याचा कोणताही विकल्प विद्यापीठाच्या संकेत स्थळावर दिलेला नाही त्यांना पदवी प्रमाणपत्रे दीक्षांत समारंभानंतर एक महिन्यानंतर दीक्षांत अर्जावरील पत्त्यावर पोस्टाने पाठविण्यात येतील.
- सर्व संलग्नित महाविद्यालयांना या दीक्षांत समारंभासाठी (In Person) अर्ज केलेल्या स्नातकांची पदवी प्रमाणपत्रे शिवाजी विद्यापीठाच्या वितरण व्यवस्थेमधून देण्यात येतील. यासाठी सर्व महाविद्यालयांनी प्राचार्य अथवा जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यास योग्य त्या अधिकार पत्रासह पाठवावे जेणेकरून संबंधिताकडे उपरोक्त प्रमाणे अर्ज केलेल्या स्नातकांची पदवी प्रमाणपत्रे हस्तातंरीत करण्यात येतील. महाविद्यालय निहाय विद्यार्थ्यांची संख्या, नांवे विद्यापीठ संकेतस्थळावर Convocation सदरात प्रसिध्द करण्यात येईल. महाविद्यालयामार्फत पदवी प्रमाणपत्र स्विकारण्यास येणाऱ्या प्राचार्य/प्रशासकीय सेवक/प्रतिनिधी यांचे सोबत महाविद्यालयाचे ओळखपत्राची सांक्षाकिंत प्रत व अधिकार पत्र असणे अनिवार्य आहे.
- Ph.D, M.Phil. स्नातक व विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागाकडील विद्यार्थी, ज्यांनी ५५ व्या दीक्षांत समारंभामध्ये (In Person) पदवी स्विकारण्याचा विकल्प दिला आहे अशा स्नातकांना विद्यापीठामध्ये समारंभादिवशी सकाळी ८ ते १ यावेळेत विद्यापीठाच्या वितरण व्यवस्थेद्वारे पदवी प्रमाणपत्र वितरीत केले जाईल. स्नातकांनी पदवीप्रमाणपत्र स्विकारताना शासकीय ओळखपत्र(आधारकार्ड/पॅनकार्ड/मतदान/ओळखपत्र यापैकी एक) वितरण अधिकारी यांना दाखवून पदवी प्रमाणपत्र प्राप्त करता येईल.

दीक्षान्त विभाग
दि. १८/२/२०१९

श्री. महेश काकडे
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ